ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51


आम्ही ५१ !

गोष्ट क्र. १२

२१ मार्च २०२१

## कल्पना भालेकर-आठल्ये

(१९७८-१९८४)



दोन वस्त्यांवरील दलांच्या अनुभवामुळे मला खूप शिकायला मिळालं. तळागाळातल्या लोकांबरोबर वागायची-बोलायची संधी मिळाली. त्यामुळे विविध प्रकारच्या अनुभवांनी माझं भावविश्व खूप समृद्ध झालं. या माणसांच्या समस्या आणि व्यथा फार वेगळ्या आहेत. खरंतर खूप जास्त प्रमाणात तिथे काम करायला हवं अशी आजही कळकळ वाटते.

शिक्षणाच्या या क्षेत्रात इतकं काही करण्यासारखं आहे की आपलीच शक्ती कमी पडते. आप्पा कायम म्हणायचे, की रोज काहीतरी नवीन सुचलंच पाहिजे. ही सवय इतकी अंगवळणी पडलेली आहे की नवीन गोष्टी करण्यासाठी रोज नव्या दिशा मिळत असतात.



jpp51_51@jnanaprabodhini.org

## हे आनंदी गाणे



माझी प्रबोधिनीची चौथी तुकडी. आज शालेय शिक्षणाबद्दल बोलताना जवळपास ४० वर्षं मागे जाऊन मी तुम्हाला गोष्ट सांगणार आहे. प्रबोधिनीचं वेगळेपण हे तिथे यायच्या आधीपासूनच जाणवलं आहे. समोरच्या रस्त्यावरून जाताना शाळेचं मंदिरासारखं दिसणारं बाह्यरूपच एक वेगळा ठसा उमटवून गेलं होतं. नंतर समजलं की प्रवेश परीक्षा असणारी आणि आपल्याला पारखून घेणारी अशी ही शाळा आहे! त्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन आम्ही या विलक्षण शाळेत प्रवेश घेतला आणि आमचा प्रवास सुरू झाला.

प्रबोधिनीच्या जगावेगळ्या वास्तूत पाचवीपासूनचं आमचं शिक्षण सुरू झालं! सगळे शिक्षक अतिशय मन लावून शिकवत असत आणि आम्हाला आमच्या कुवतीप्रमाणे शिकण्याची मुभा देत-देत शिकवत असत. जीवशास्त्र शिकताना पाठ केलेले शब्द आजही त्या पद्धतीमुळे जसेच्या तसे लक्षात आहेत. देवनागरीतून इंग्रजी शिकण्याचा प्रयोगही अफलातून होता. नेहमीच्या विषयांबरोबरच चाकोरीबाहेरचं शिक्षणही आम्हाला मिळालं. आमच्या वेळापत्रकामध्ये वाचन, प्रतिभाविकसन, गृहशास्त्र असे अनेक वेगवेगळे विषय असायचे. यातल्या गृहशास्त्राच्या तासाला आम्ही वेगवेगळे पदार्थ करायला शिकलो. आठवड्यातून एक संचालक असा तास असे. या तासाला कै. आप्पा स्वतः यायचे, गोष्ट सांगायचे, काही प्रसंग सांगायचे आणि विचार करायला शिकवायचे. आप्पांना नावीन्याचा ध्यास होता आणि तो ध्यास त्यांनी प्रत्येक प्रबोधकाला लावला असं मला वाटतं.

**तेव्हाचे पंतप्रधान मा. मोरारजीभाई देसाई यांनी प्रबोधिनीला भेट दिली होती, तेव्हा नलूताई उपप्राचार्या होत्या. त्यांनी आमच्याकडून 'हे आनंदी गाणे' या एका तीन मिनिटांच्या पद्याचा जवळपास तीनशे वेळा तरी सराव करून घेतला होता. झोकून दिल्यासारखे आम्ही जेव्हा वेळ मिळेल तेव्हा ते पद्य गात असू आणि त्याचा परिणाम म्हणजे आजही ते पद्य त्यातल्या हालचालींसह अगदी जसेच्या तसे पाठ आहे.**

शाळेमाध्ये 'सहाध्याय दिन' हा एक आणखी वेगळा अनुभव. जलशुद्धीकरण केंद्र, कात्रज दूध केन्द्र, सर्पोद्यान अशा अनेक जागांना आम्ही भेटी दिल्याचे आठवते.

## कलश विराजित वास्तू

आम्ही दहावीत असताना आत्ताच्या वास्तूचे कलश वरती चढवले गेले होते आणि त्या प्रसंगाचे आम्ही साक्षीदार आहोत हे सांगायला आज खूप आनंद वाटतो. या कलशविराजित वास्तूची प्रतिमा प्रबोधिनीतील प्रत्येकाच्या मनात बेहमीच असते.

**याच वर्षात कै. आप्पांनी सांगितलेल्या शेवटच्या उपासनेमध्ये आम्ही सहभागी होतो. त्या दिवशी त्यांनी नेहमीपेक्षा थोडी वेगळी उपासना सांगतली आणि नेहमी वीस मिनिटे चालणारी उपासना अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ चालल्याचे आठवते. कै. आप्पांनी सांगितलेली ती उपासना आजही सकारात्मक ऊर्जा देऊन जाते.**

उपासना आणि प्रार्थना या गोष्टी प्रबोधिनीची वैशिष्ट्ये म्हणता येतील. त्याचा होणारा परिणाम हा जन्मभर पुरणारा असतो. मी अनेक वर्षं सकाळी ६.१५ ला प्रबोधिनीत होणाऱ्या उपासनेमध्ये सहभागी होत होते आणि त्यामुळे माझ्या आयुष्यावर झालेल्या सकारात्मक परिणामाची जाणीव मला नक्कीच आहे.

आमचं दल संध्याकाळी असायचं. आमच्या दलांना स्फूर्ती, शक्ती, मुक्ती अशी नावं होती. शाळा सकाळी आणि दल संध्याकाळी असे. लांब राहणाऱ्या विद्यार्थिनींना दुपारभर प्रबोधिनीच्या शेजारी असलेल्या परांडे वाड्याच्या वास्तूतील युवती विभागात थांबण्याची व्यवस्था होती. सकाळची शाळा झाल्यावर आम्ही तिथेच थांबायचो. त्यामुळे १२ ते १४ तास आमची शाळा चालायची. अशा अनेक कारणांमुळे प्रबोधिनी हे आमचं दुसरं घरच झालं होतं. दलांबरोबरच युवती विभागाची झालेली वेगवेगळी शिबिरं आणि सहली हे सगळंच अतिशय आनंददायी होतं. हिंगणे येथील शिबिर तर अगदी अविस्मरणीय आहे. त्यामध्ये माझा झालेला छोटासा अपघात आणि त्यानिमित्तने आलेले अनुभव अतिशय हृद्य आहेत.

## शिकणे आणि शिकवणे

माझ्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीकडे पाहता खरोखरच 'करिअर' असा काही शब्द मला माहीतच नव्हता.

आपण पुढे असं काही ठरवायचं असतं, करायचं असतं हेच मला शाळेत असताना माहीत नव्हतं. आपल्या मैत्रिणी पुढे शिकतात तर आपणही शिकायचं एवढंच ठरवलं होतं, हे मी अगदी प्रांजळपणे सांगते. काही निमित्तं होत गेली, आणि माझं आयुष्य घडत गेलं. मला गणित आणि विज्ञान हे दोन्ही विषय अतिशय आवडायचे आणि त्यानुसार मी ११वीची प्रवेश प्रक्रिया विज्ञान शाखेत सुरू केली होती. पण दरम्यानच्या काळात एकदा आण्णांना भेटायला गेले तेव्हा त्यांनी सांगितलं 'तुम्ही संस्कृत शिका.' त्या आमच्या चर्चेनंतर मी कला शाखेला प्रवेश घेऊन संस्कृत शिक्षणाची दिशा निवडली.

शाळेनंतर ११वी पासून बी. ए. पदवीपर्यंतचे शिक्षण मी स. प. महाविद्यालयातून पूर्ण केलं. त्यानंतर मी सोलापूर येथे पूर्ण वेळ काम करण्यासाठी म्हणून एक वर्ष गेले होते. परत आल्यावर मी बी. एड्. पूर्ण केलं. त्यानंतर पुणे विद्यापीठातून एम. ए. केलं. SET-NET च्या परीक्षा उत्तीर्ण केल्या आणि २००९ ते २०१३ या कालावधीत Ph. D. पूर्ण केलं. मला शिकवायला आवडतं. मी आमच्या वाड्यातल्या लहान मुलांना शिकवीत असे, माझ्या प्राथमिक शाळेत शिकवीत असे. मी ११वीत असताना आपल्याच शाळेच्या इयत्ता ५वीच्या वर्गाला मला शुद्धलेखन आणि हस्ताक्षर शिकविण्याची संधी मिळाली. या अनुभवातून आपल्याला शिकवायला आवडतंय हे मला कळत गेलं आणि आजपर्यंत ही आवड जोपासण्याची संधी मला मिळाली आहे.

### देशप्रश्न समजून घेताना

**अकरावीत असतानाच माझ्यासह चौघींना सांगलीत एक शिबिर घेण्यासाठी पाठवलं होतं. आम्ही तिथे पूर्वतयारी करत असताना त्यावेळच्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांची हत्या झाली आणि देशभर संचारबंदीचं वातावरण निर्माण झालं. आम्ही तिथेच अडकलो. वातावरण थोडंसं निवळल्यानंतर पुण्यात परतलो. ते शिबिर रद्द करावं लागलं. प्रबोधिनीने आमच्यावर खूप विश्वास टाकला आणि केवळ १७ वर्षांच्या युवती आहेत तर त्यांना जमेल का, असे प्रश्न कधी विचारले नाहीत. अशा वेगवेगळ्या अनुभवातून आपली प्रगल्भता आणि आपल्या विचारांचं क्षितीज वाढत जातं.**

**पंजाब येथील अभ्यासदौरा असाच लक्षात राहणारा होता. त्यावेळेला तिथे खलिस्तानची मागणी करणारी आंदोलनं चालली होती. तुम्ही आमचा एक अविभाज्य अंग आहात आणि तुम्ही वेगळे होऊ नका असं पंजाबच्या आपल्या बांधवांना सांगण्याचं सूत्र ठेवून आम्ही गेलो होतो. तिथे आम्ही पदयात्रा केली. रोज जवळपास २५-३० किलोमीटर आम्ही पायी चालत होतो. तिथे प्रत्येक ठिकाणी जाऊन भजनं म्हटली, भेटी दिल्या. तिथल्या वातावरणातली दहशत काही प्रमाणात आम्हाला जाणवत होती, असे काही अनुभवही आम्हाला आले. त्या दौऱ्याच्या शेवटी आम्ही राष्ट्रपतींना भेटलो होतो.** त्या दौऱ्यात मला एक नवी मैत्रीण मिळाली होती, जिच्याशी माझा अनेक वर्षं पत्रव्यवहार चालू होता. राजस्थान, बिहार येथे आलेला पूर व भूकंपासाठी मदत कार्याचा दौरा, पाँडिचेरी, कन्याकुमारी, सोलापूर अशा अनेक ठिकाणी आमचे विविध दौरे, सहली, शिबिरं झाली.

**प्रबोधिनीच्या गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीत बरची नृत्याचा युवकांचा गट दरवर्षी सहभागी होत असे. त्याच मिरवणुकीत आम्ही मात्र काही गीते, भजनं इ. म्हणत सहभागी होत असू. परंतु आम्हा युवतींनाही बरची नृत्याचा गट म्हणून सहभागी व्हावेसे वाटत असे. आम्हीही हट्ट करून परवानगी मिळवून युवतींचा गट तयार केला. ढोल-ताशा वाजवायला शिकलो. आणि आमचाही एक वाद्यवृंद तयार झाला. हे पुण्यातलं क्रांतिकारक असं पाऊल होतं.** आज आता असे अनेक वाद्यवृंद तयार झाले आहेत.

प्रबोधिनीत युवती विभागाचं काम म्हणून महाविद्यालयीन गटासाठी 'संवेदना' म्हणून एक अभ्यासगट सुरू केला होता. वेगवेगळी पुस्तकं, वेगवेगळी चर्चासत्रं, वेगवेगळ्या प्रश्नांचा आणि उत्तरांचा अभ्यास या माध्यमातूनही अनेक युवती प्रबोधिनीशी जोडल्या गेल्या. तसंच युवती विभागाचं काम करण्यासाठी मी आणि अभयाने तीन वर्षं सासवड येथे साप्ताहिक दल आणि अनुषंगिक उपक्रम घेतले याचा फक्त उल्लेख करते.

### प्रबोधिनीतील निवास आणि सहवास

१९८८ सालापासून ते १९९३ या काळात मी प्रबोधिनीत राहायला होते. मी दिवसभर तिथेच काम करायचे आणि फक्त झोपायला घरी जायचे. तेव्हा कै. आण्णांनी प्रबोधिनीतच राहायला ये असं सांगितलं. अगदी सकाळी ६.१५ पासून रात्री ११ पर्यंत काम करत असलेला, कामामध्ये आकंठ बुडालेला असा तो काळ होता. याच काळात माझं M.A. चालू होतं. M.A. च्या परीक्षेच्या आधी मला नागीण झाली होती आणि औषध घेऊन परीक्षेसाठी जावे लागले होते. पण प्रबोधिनीत आपण जी अभ्यास कौशल्यं शिकतो किंवा ज्या अभ्यासाच्या चांगल्या सवयी आपल्याला लागतात त्यामुळे मी ती परीक्षा पार

करू शकले आणि मला त्या परीक्षेत सुवर्णपदक मिळालं. अभ्यास करताना मला घरामध्ये काही अडचणी होत्या पण अगदी आव्हानात्मक म्हणावं असं काही नव्हतं. मी जेव्हा प्रबोधिनीमध्ये काम करायचे तेव्हा मला दुसरं काही सुचतच नसे. अखंड प्रबोधीनीमय असा तो कालखंड होता. आता प्रबोधिनी सोडून खरंतर २२ वर्षांचा काळ गेलाय. पण या सगळ्या गोष्टी अगदी कालच घडून गेल्या आहेत असं वाटावं इतक्या ताज्या आहेत.

१९९७८ ते १९८४ हा प्रबोधिनीतला शाळेत शिकतानाचा पहिला कालखंड. **१९८४ ते १९९७ अशा दुसऱ्या कालखंडातील तेरा वर्षांच्या काळात मला प्रबोधिनीच्या विविध उपक्रमांमध्ये, विविध विभागांमध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यातलाच एक भाग म्हणजे प्रशालेमध्ये शिकवणं. मुख्यत: संस्कृत शिकवण्याचे माझे काम होते. शाळेमध्ये शिकवण्याबरोबरच प्रबोधिनीच्या संस्कारानुसार आणि परंपरेनुसार अनेक उपक्रमांचे आयोजन केले होते. या काळातला वर्गशिक्षिका म्हणून काम केल्याचा अनुभव हा सगळ्यात आनंदाचा आणि अविस्मरणीय आहे. संस्कृत शिकवताना नावीन्य असायला हवं म्हणून संस्कृतविषयक विविध उपक्रम घेतले. शिकवण्याच्या नवीन–नवीन पद्धती वापरून पाहिल्या. संस्कृत माध्यमातून संस्कृत भाषा शिकवण्याचा प्रयत्न केला. संस्कृत संभाषण कौशल्य, संस्कृत गाणी–गोष्टी या सगळ्याचे प्रयोग केले.** याबरोबरच वर्गातल्या विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढविण्यासाठी सुरुवातीला काही गोष्टी सांगणं असेल, वाचून दाखवणं असेल असेही अनेक प्रयोग मी करून पाहिले. भारताची संस्कृती, भारताची परंपरा आणि आपल्या देशाचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोचावा म्हणून अनेक उपक्रम आम्ही घेतले. वेरूळ, कैलास लेणी असा परिसर आम्ही जाऊन पाहून आलो. कुठल्याही सहलीला जाताना कधीही सिनेमातली गाणी म्हटल्याचं मला आठवत नाही आणि त्याच्यामुळे मजा कमी झाल्याचंही मला खरंतर आठवत नाही. प्रवासभर म्हणता येतील इतकी पद्ये, विविध भाषेतल्या कविता मुलींना येत होत्या. याबरोबरच नद्यांची नावं, गावांची नावं अशा वेगवेगळ्या प्रकारच्या भेंड्या खेळल्याचेही आठवते. या सहलींचे नियोजन करताना संपूर्ण वेळेचा अंदाज येणं आणि काम वेळेत सुरू करून वेळेत संपवणे हे आपल्याला प्रबोधिनीतल्या संस्कारामुळे जमतं.

### विद्यार्थ्यांच्या घडणीसाठी



प्रशालेतील अध्यापनाचा काळ अतिशय आनंदाचा होता. ज्या वर्गाची वर्गशिक्षिका होते त्यांच्याशी जे नातं जुळलं ते आजही आठवणीत आहे. मी पाच वर्षं त्यांच्याबरोबर राहिले. मी युवती विभागातली होते, माजी विद्यार्थिनीही होते, अशा सगळ्या अनुभवाचा उपयोग मला या कामात होत गेला. अनेक उपक्रम केले त्यातला सर्वात लक्षात राहिलेला उपक्रम म्हणजे वार्षिक परीक्षेनंतरच्या काळात योजलेले उपक्रम. पुण्यातील माहिती मिळालेल्या सर्व म्हणजे जवळ–जवळ १५–१६ संग्रहालयांना भेटी आणि गटकार्याने समारोप, पडसरे येथील शाळेतल्या मुलांचे स्नेहसंमेलनासाठी विविध कार्यक्रम बसवून तो कार्यक्रम करणे, भगवद्गीता संथा आणि पाठांतर, प्रबोधिनी परिचय अन्तर्गत प्रबोधिनीतील सर्व विभागांना तसेच शिवापूर आणि निगडी केंद्रांना भेटी अशा उपक्रमांतून विविध अनुभव मुलींनी घेतले. हा वर्ग अतिशय दंगेखोर होता आणि त्यांच्या वेगवेगळ्या तक्रारी अनेकदा येत असत. मी त्यांना तेवढ्याच शिक्षाही करायचे. पण अगदी कुटुंबासारखी घट्ट वीण असलेला असा तो माझा वर्ग होता असं म्हणायला हरकत नाही. अजूनही आमच्या सगळ्यांकडे हा आयुष्याचा अनमोल ठेवा नक्की असेल. आज आमच्या सगळ्यांमध्ये काळाचं अंतर आहे, ठिकाणं वेगळी आहेत पण आमच्या मनातलं अंतर नक्की नाही ही मला खात्री आहे.

### नागरीवस्त्या आणि तेथील भावविश्वाची ओळख

मी प्रबोधिनीची द्वितीय प्रतिज्ञा घेतलेली होती. युवती विभागामध्ये प्रशालेय आणि अन्य प्रशालेय दलं घेतली. तिथे काही प्रयोग केले. धनकवडीसारख्या तेव्हाच्या अतिशय दुर्गम भागात साप्ताहिक दल सुरू केलं. आणि रविवार पेठेतलं घर ते प्रबोधिनी, किंवा घर ते धनकवडी हा सगळा प्रवास मी सायकलने करत होते. घराघरात जाऊन, वेगवेगळ्या पार्श्वभूमीच्या मुलींना एकत्र करायचं, त्यांचं दलावरच्या उपस्थितीचं सातत्य कायम ठेवायचं, यासाठी लागणारे प्रयत्न आणि संघटना करण्याचं शिक्षण हे त्या काळात मिळालं. पुण्याचा पूर्वभागातील दोन शाळांमध्ये जाऊन तिथल्या मुलींसाठी काम करत होते.

प्रबोधिनीच्या संघटना करण्याच्या प्रयोगातला एक अतिशय महत्त्वाचा भाग म्हणजे आपण ज्या मुलींचं दल घेतो त्यांच्या घरची परिस्थिती काय आहे हे समजून घेण्यासाठी मुलींच्या घरी जाणं. त्यामुळे विविध प्रकारची माणसं भेटतात, नवीन ओळखी होतात आणि संघटनेमधला सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे घरी गेल्यामुळे माणसं समजून घेता येतात आणि त्या अनुषंगाने कामामध्ये बदल करता येतो. त्या भागातील विविध वस्त्यांमध्ये पायी किंवा सायकलने प्रवास केला, तेव्हा अनेक नकारात्मक अनुभव आले. काही मुलांनी मागून आपल्या खोड्या काढणं, चाकू दाखवणं, वस्तीतली भांडणं या सगळ्याशी सामना करावा लागला. त्या मुली प्रबोधिनीशी सातत्याने जोडल्या जाऊ शकल्या नाहीत पण या दलांमुळे त्यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रात यश मिळत गेलं. या दोन वस्त्यांच्या दलांच्या अनुभवामुळे मला खूप शिकायला मिळालं. तळागाळातल्या लोकांबरोबर वागायची बोलायची संधी मिळाली. इतक्या विविध प्रकारच्या अनुभवांनी माझं भावविश्व खूप समृद्ध झालं. या माणसांच्या समस्या आणि व्यथा फार वेगळ्या आहेत, खरंतर खूप जास्त प्रमाणात तिथे काम करायला हवं अशी आजही कळकळ वाटते. सुदैवाने प्रबोधिनीत मला अशा बऱ्याच गोष्टी करायची संधी मिळत गेली.

### सोलापूरमधील पूर्ण वेळाचे काम

सोलापूरच्या प्रशालेची पायाभरणी होत असताना मी आणि सुवर्णा तिथे काम करायला गेलो होतो. अगदी बालवाडीपासून ते आठवीपर्यंत शिकवण्याचा अनुभव मिळाला. आम्हाला बालवाडीला कसं शिकवतात याची काहीच कल्पना नव्हती. अगदी त्याचं प्रशिक्षण घेण्यापासूनची तयारी आम्हाला तिथे करावी लागली होती. शिकवण्याबरोबरच मुलांची आणि मुलींची दले घेणे, विद्यार्थ्यांच्या घरी जाणे हे नित्य कामही चालू होते. मुलींची दले घेण्याचा अनुभव होता पण मुलांची दले घेण्याचा अनुभव मात्र नवीन होता. सोलापुरातील सर्व संस्कृतचे शिक्षक, संस्कृतप्रेमी यांना एकत्र करून काही उपक्रम घेतले होते. या उपक्रमाच्या उद्‌घाटनासाठी त्यावेळी संत्रिकेचे काम करणारे अर्जुनवाडकर सर आले होते. या निमित्ताने सोलापुरातील संस्कृतप्रेमींशी संवाद निर्माण झाला होता. सोलापुरातही खूप अनुभव घेतले पण माझ्यावर दूरगामी संस्कार करणारी एक घटना सांगावीशी वाटते. एका शिबिरात एक वक्ते येणार नसल्याचं चार तास आधी समजलं. लताताईंनी 'देश नसलेला माणूस' हे पुस्तक हातात दिलं आणि सांगितलं की चारच्या सत्रात ही गोष्ट सांग. मला ताण आला पण करायचं होतंच. दोन तासात ते पुस्तक वाचलं, मग सांगण्याची जेमतेम तयारी करून सांगण्याचं धाडस केलं. त्यात मी आणि माझ्यासमोरची मुलं रंगून गेलो होतो. मी ती कथा नंतरही अनेकदा सांगितली. पण त्यावेळी जशी सांगितली तशी पुन्हा कधीच सांगितली गेली नाही. ती कथा त्यावेळच्या मुलींच्या लक्षात राहिल्याचे त्यांनी मला सांगितले आहे. यातून झालेलं शिक्षण आणि संस्कार अनमोल आहे.

### संत्रिका आणि ज्येष्ठांचे मार्गदर्शन

पुण्यात असताना मला संत्रिकेमध्ये म्हणजेच संस्कृत- संस्कृती-संशोधिकेमध्ये काम करण्याची संधी मिळाली. तिथे मा. यशवंतरावांच्या मार्गदर्शनाखाली अनेक उपक्रम नव्याने सुरू केले. त्यापैकी एक म्हणजे मंत्रपठण वर्ग. अनेक लोकांना स्तोत्र किंवा रोजच्या पूजेसाठी मंत्र म्हणायची इच्छा असते परन्तु माहिती नसते. यासाठीचा अभ्यासक्रम तयार करण्याची संधी मला मिळाली. त्या वर्गात अथर्वशीर्ष शिकवण्याचीही संधी मिळाली. एका हस्तलिखिताचे भाषांतर, 'उपनिषदामधील मन आणि बुद्धी संकल्पना' यावरील संशोधनकार्यात मदत करण्याची संधीही मला तिथे मिळाली होती.

काम करत असताना काही मोठ्या लोकांना जवळून पाहण्याची, अनुभवण्याची संधी मला मिळाली. आदरणीय आण्णा हजारे, पूजनीय विमलाजी ठकार आणि डॉ. भीमराव गस्ती यांच्याबाबतचा माझ्या आयुष्यातला अनुभव अविस्मरणीय आहे. राळेगणसिद्धी इथे प्रबोधिनीच्या प्रदीर्घ बैठकीच्या पूर्वतयारीसाठी मी एकटी गेले होते. तेव्हा आण्णा हजारे यांच्याशी व्यक्तिशः भेट झाली. त्यांनी स्वतः तिथला एक प्रकल्प दाखवला होता, त्यावेळी त्यांच्याशी बोलण्याची संधी मला मिळाली होती.

मा. यशवंतरावांच्या सांगण्यानुसार बेळगावजवळील एका गावात डॉ. भीमराव गस्ती यांनी योजलेल्या एका कार्यक्रमात जायची संधी मिळाली. कार्यक्रमात भाषण करताना लक्षात आलं, की ऐकणाऱ्या समूहामध्ये कन्नडभाषी लोक जास्त आहेत. मराठी कळत नाही असं नाही पण भाषण जरा जड जाऊ शकतं. मग मी तिथे साभिनय एक छोटी गोष्ट सांगून भाषण संपवलं. तिथल्या स्त्रियांबरोबरचा संवाद, भीमरावांच्या घरी जाण्याचा अनुभव हे सारं अजूनही लक्षात आहे.



शिवापूर येथे योजलेल्या एका अभ्यासशिबिरात पूजनीय विमलाजी ठकार मार्गदर्शक म्हणून आल्या होत्या. तेव्हा त्यांची सेवा करण्याची संधी मला मिळाली. मा. आण्णांनी मला 'त्यांच्यासोबत सावलीसारखं राहा' असं सांगितलं होतं. हा एक वेगळा अनुभव होता, अगदी आजही गहिवरून यावं असा तो अनुभव माझ्यासाठी होता.

## ग्रामीण प्रज्ञा विकास

या प्रकल्पाच्या पहिल्या वर्षी कुंजीरवाडी, भोर, सासवड या गावांमध्ये काम सुरू केलं तेव्हा त्याची जबाबदारी माझ्याकडे होती. आम्ही तीन किंवा चार जण मिळून हे काम करत होतो. मी कुंजीरवाडी येथील शाळेत जात होते. तिथे साप्ताहिक तासिका घेत असे. त्या काळात मुलांच्या घरी जाण्याच्या निमित्ताने सगळं गाव ओळखीचं झालं होतं. तिथला एकच अनुभव सांगावासा वाटतो. तिथे अनिवासी शिबिर योजलं होतं पण पाच दिवस मी मुक्कामासाठी गेले होते. आता काहीच वाटणार नाही पण त्यावेळी तिथे संडास नव्हते त्यामुळे स्त्रियांना काय आणि कसं या गोष्टीला तोंड द्यावं लागतं हे अनुभवलं. आता ही सर्व गावं या अर्थाने विकसित झालेली आहेत. पण या गावातले अनुभवही खूप शिकवणारे ठरले आहेत.

प्रशालेत शिकवत असतानाच मी ग्रामीण प्रज्ञा विकास प्रकल्पाचे काम करत होते. यावरून एक सांगावंसं वाटतं, आपल्याला बऱ्याचदा अनेक वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. प्रबोधिनीत आपण एक अतिशय महत्त्वाची गोष्ट शिकतो ती म्हणजे multi tasking आणि त्यातूनच आपली तयारी होत जाते. आपल्यावर एकदा जबाबदारी आली की त्याला लागणारं कौशल्य आपण शिकतो आणि झालेल्या चुकांमधून, अनुभवातून, आपण अनेक कामं एका वेळेला करण्याचं प्रशिक्षण घेत असतो.

खरंतर प्रबोधिनीत घेतलेल्या अनुभवांची ही एक झलक आहे. या गोष्टींच्या निमित्ताने आज अनेक प्रसंग आठवले. त्यातून आपण कसे वाढलो, समृद्ध झालो हे तटस्थपणे डोकावून पाहाता आलं.

१९९७ पासून मी रत्नागिरीत वास्तव्याला आहे. माझ्या सध्याच्या कामाचं स्वरूप सांगायचं झालं तर मी गोगटे-जोगळेकर महाविद्यालयात संस्कृत विभागप्रमुख आहे व कला शाखेची उपप्राचार्या म्हणून जबाबदारी आहे.

## संस्कृत विषयातील अध्यापन आणि संशोधन



रत्नागिरीला मी खरंतर अपघाताने आले. प्रशालेत शिकवत असताना घशाच्या समस्येमुळे वैद्यकीय कारणास्तव डॉक्टरांनी शिकवणं थांबवा असा सल्ला दिला होता. त्यानंतर काही वेगळे काम सुरू केलं होतं. परंतु शिक्षणाची आणि शिकवण्याची आवड यामुळे माझं मन काही त्या कामात रमत नव्हतं. त्याच दरम्यान रत्नागिरीत राहाणाऱ्या माझ्या मैत्रिणीकडून महाविद्यालयात संस्कृत शिकवण्याची संधी आहे असे कळले. फारफार तर ८-१० विद्यार्थ्यांचा वर्ग, त्यामुळे घशावर ताण येणार नाही असं बोलणं झालं. त्यामुळे कदाचित मला आवडतं काम करता येईल या विचारानं मी अगदी सहजच रत्नागिरीला आले. तत्कालीन प्राचार्यांकडे मुलाखतीला गेले असताना काही प्रश्न विचारून त्यांनी मला लगेच join व्हा असे सांगितले. माझ्यासाठी तो एक खूपच अनपेक्षित असा धक्का होता. मी रत्नागिरीला जाते आहे हे मी घरी, प्रबोधिनीत कुणालाच सांगितलं नव्हतं. म्हणून मी आठ दिवसांची मुदत मागून घेतली. परत पुण्याला आले, सर्वांना सांगितलं आणि आठ दिवसांनी गोगटे- जोगळेकर महाविद्यालयात संस्कृत अध्यापनाचे काम सुरू केले. प्रामाणिकपणे सांगायचं तर कुठलाही उद्देश डोळ्यासमोर ठेऊन मी इथे आले नव्हते.

पहिली तीन वर्षं मला पुण्याला परत जायची ओढ होती आणि द्विधा मन:स्थिती होत असे. पण २००१ साली लग्नाचा निर्णय घेतल्यामुळे रत्नागिरी मुक्काम निश्चित झाला.

माझं शिक्षण पुणे विद्यापीठातलं आणि इथे मुंबई विद्यापीठाचा अभ्यासक्रम शिकवायचा होता. मला बराच भाग नवीन होता. काही फरकही होता. पहिले वर्षभर तास झाले की ग्रंथालयात जाऊन अभ्यास करत असे. पहिले संपूर्ण वर्ष मनसोक्त ग्रंथालयात घालवता आले. वर्गातल्या शिक्षणाबरोबरच मी इथे अंदाज घेत-घेत उपक्रम सुरू केले. संस्कृत दिनाचा कार्यक्रम पूर्ण संस्कृतमध्ये सादर करणे, त्यासाठी विद्यार्थ्यांचे कार्यक्रम बसवणे, विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित करणे अशा उपक्रमांपासून सुरुवात केली ते आजही चालू आहेत. अशा अनेक उपक्रमांपैकी काहींची माहिती द्यावीशी वाटते.






**स्तोत्र पाठांतर योजना हा उपक्रम आम्ही पाच वर्षे घेतला होता. ऑगस्ट ते जानेवारी या कालावधीत महाविद्यालयातल्या विद्यार्थ्यांनी इथल्या वेगवेगळ्या शाळांमध्ये आठवड्यातून दोन किंवा तीन दिवस जाऊन स्तोत्र शिकवणे हे या उपक्रमाचे स्वरूप. त्यासाठी जून–जुलै महिन्यांमध्ये प्रशिक्षण, ऑगस्ट ते जानेवारी या कालावधीत शाळांमध्ये हा उपक्रम आणि जानेवारी ते मार्च या काळात त्या उपक्रमाचं परीक्षण असं याचं नियोजन होतं. पहिल्या वर्षी आठ शाळांपासून सुरुवात केली ती शेवटच्या वर्षी १५ शाळांपर्यंत गेली. महाविद्यालयीन विद्यार्थी स्तोत्र शिकवताना उच्चारण, स्तोत्राचा अर्थ आणि थोडं रंजक करण्यासाठी त्या अनुषंगाने गोष्टीही सांगत असत. या योजनेत विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारचं बक्षीस, प्रमाणपत्र दिलं जात नसे. स्तोत्र म्हणण्याचा आनंद त्यांनी मिळवावा हा उद्देश होता आणि तो सफलही झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीही मोबदल्याची अपेक्षा न करता हा अनुभव घ्यावा असे आवाहन करत असे. नेतृत्वविकसन आणि मूल्यवर्धन अशी सांगड घालणारा हा एक उपक्रम होता.** या उपक्रमाची सांगता आम्ही रत्नागिरीत झालेल्या बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेच्या अधिवेशनामध्ये केली. १५ शाळांचे सुमारे १००० विद्यार्थी आमच्या महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर एकत्र येऊन त्यांनी एकस्वरात ५ स्तोत्रे म्हटली आणि 'संस्कृतमयं भवतु मम राष्ट्रम्' या गीताने स्तोत्रगंगा या कार्यक्रमाची सांगता केली. हा अनुभव खूप सुंदर आणि त्यात सहभागी झालेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांना आनंद देणारा ठरला.

**आणखी एक वेगळा उपक्रम म्हणजे 'संस्कृतसंध्या' या नावाचा गीतवाद्यवृंद अर्थात ऑर्केस्ट्रा तयार केला होता. २५ ते ३० विद्यार्थ्यांचा समूह यात सहभागी होता. विविध प्रकारची संस्कृत गाणी यात सादर केली गेली. काही गाण्यांवर नृत्य बसवली होती. मिमिक्रीचाही समावेश केला होता. आम्ही याचे सहा प्रयोग केले. हा पण अनुभव छान होता.**

याखेरीज वर्षातून दोनदा सहल, त्यातली एक पावसाळी तर एक अभ्याससहल असे नियोजन करत होते. सहलींचे नियोजन हे विद्यार्थ्यांच्या प्रतिसादावर अवलंबून असतं. गेल्या २२ वर्षांत अशा अनेक सहलींचे आयोजन केले आहे. अलिकडचं एक उदाहरण द्यायचं झालं तर मंगळूर इथे मुलींसाठी चालू असलेल्या मैत्रेयी गुरुकुलाला आम्ही भेट दिली होती. तिथे मुली वेदाध्ययन करतात. या गुरुकुलाबरोबरच मुलांचे प्रबोधिनी गुरुकुल, शृंगेरी येथील शंकराचार्यांचा मठ, राष्ट्रीय संस्कृत संस्थानचा विद्यापीठ परिसर अशा अनेक ठिकाणी भेटी दिल्या. काही प्रेक्षणीय स्थळेही पाहिली. अशा प्रकारे अनेक सहलींच्या आठवणी विद्यार्थ्यांच्याही मनात कोरलेल्या आहेत.

महाविद्यालयामध्ये रत्नागिरीकरांसाठी दरवर्षी '**कालिदास स्मृति समारोह व्याख्यानमाला**' आयोजित केली जाते. या व्याख्यानमालेचे हे वर्ष ६४ वे होते. ही परंपरा अखंडपणे चालू आहे. या व्याख्यानमालेच्या निमित्ताने संस्कृत क्षेत्रातील अनेक विद्वान नामवंत लोकांशी संवाद साधण्याची संधी मिळते, त्यांचा सहवास लाभतो. नुकतेच या व्याख्यानमालेत येऊन गेलेले डॉ. बलदेवानंद सागर हे आकाशवाणीवर संस्कृतमधून बातम्या देणारे पहिले प्रवाचक! अनेक वर्षं ते या संस्कृत माध्यम (मिडिया) क्षेत्रात काम करत आहेत. त्यांच्याशी संवाद साधण्याचा अनुभव समृद्ध करणारा होता. अशा अनेकांची नावं सांगता येतील. पण आणखी दोन नावं सांगावीशी वाटतात ती म्हणजे प्राचार्य राम शेवाळकर आणि संपूर्णानन्द, संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु आणि आधुनिक संस्कृत साहित्यकार




**मा. इंदुमती काटदरे यांच्या बरोबर**

डॉ. अभिराज राजेन्द्र मिश्र. हा एक संपूर्ण रत्नागिरी शहरासाठीचा म्हणून मोठा आणि प्रतिष्ठित कार्यक्रम असतो. महाविद्यालयातील माझ्या प्रारंभीच्या काळात अगदी घरोघरी जाऊनही मी याची निमंत्रणे दिली आहेत. या एका उपक्रमामुळे सुद्धा माझे अनुभव विश्व समृद्ध झाले आहे.

**आणखी एक उपक्रम म्हणजे गेली पाच वर्षं नवी दिल्ली येथील राष्ट्रीय संस्कृत संस्थान म्हणजेच आत्ताचे केन्द्रीय संस्कृत विश्वविद्यालय यांचे अनौपचारिक संस्कृत शिक्षण केन्द्र आमच्या महाविद्यालयाला मिळाले आहे. हे केन्द्र मिळण्यासाठी दरवर्षी अर्ज करावा लागतो. अशा प्रकारे पाच वर्षं हे केन्द्र मिळाले आहे.** या केन्द्रात शिकण्यासाठी दरवर्षी १०० हून अधिक जणांनी नावनोंदणी केलेली आहे. या योजने अंतर्गत सध्या इथे हिमाचल प्रदेश मधून शिक्षक आलेले आहेत. या केन्द्रात अगदी १२ वर्षांपासून ते ८० पुढील वयाचे ही लोक सहभागी झालेले आहेत.

महाविद्यालयात दरवर्षी अन्तिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आम्ही निरोप समारंभाऐवजी शुभेच्छा समारंभ आयोजित करतो. या आणि आणखीही आयोजित केल्या जाणाऱ्या अनेक उपक्रमांमधून संस्कार झालेले काही विद्यार्थी आज त्यांच्या क्षेत्रात खूप चांगले काम करीत आहेत याचा आनंद आणि समाधान मनात आहे.

महाविद्यालयातील कामाबरोबरच रत्नागिरीमध्ये १०० वर्षांहून अधिक काळ चालणारी श्री गोविंद केशव रानडे संस्कृत पाठशाळा आहे, तिथे विश्वस्त म्हणून काम करते. तसेच संस्कृतभारती या संस्कृतसाठी काम करणाऱ्या संस्थेशी माझा संबंध प्रबोधिनीत असल्यापासून आहे. संस्कृत संभाषण वर्गाच्या माध्यमातून संस्कृत भाषा जनभाषा करण्याचं व्रत घेतलेल्या या संस्थेचं कामही मी यथाशक्ती करते आहे. आज मी रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष म्हणून काम करते. हे पद असलं तरी प्रबोधिनीप्रमाणेच आम्ही संस्कृतभारतीचे कार्यकर्ते तिथे एकत्र काम करत असतो.

## शोधप्रबंध – पंचकोशविचार

२०१३ साली मी माझा विद्यावाचस्पती पदवीसाठीचा शोधप्रबंध पूर्ण केला. 'पंचकोशविचार' हा माझ्या प्रबंधाचा विषय होता. या विषयाची प्रेरणा मला आपल्या निगडीच्या आ. वामनराव तथा भाऊ अभ्यंकरांनी सुरू केलेल्या गुरुकुल प्रकल्पावरून मिळाली. १९९५ च्या दरम्यान जेव्हा या प्रकल्पाची सुरुवात होत होती तेव्हा मी आठवड्यातून एकदा निगडीला जात असे. तेव्हापासून मला या विषयावर अभ्यास करायची इच्छा होती.

मला या पीएच् डी.च्या कामासाठी UGC च्या Faculty Improvement Programme अंतर्गत फेलोशिप मिळाली. याचे स्वरूप म्हणजे एक वर्ष पीएच्. डी.च्या अभ्यासासाठी रजा मिळाली. त्या काळात मी पुण्यात आले होते. त्यामुळे मला डेक्कन कॉलेजमध्ये संशोधन पद्धतीवरील एक अभ्यासक्रम पूर्ण करण्याची संधी मिळाली. पुन्हा एकदा विद्यार्थी म्हणून शिकण्याचा आनंद खूप वेगळाच होता.

या विषयासाठी मला प्रबोधिनीतून खूप मदत झाली. आदरणीय वामनरावांशी तर अनेक वेळा बोलणे होत होतेच. आमच्या कित्येक भेटी आणि चर्चा या काळात झाल्या. याबरोबरच मा. यशवंतराव, मा. गिरीशराव, मा. उषाताई या सगळ्यांचं मार्गदर्शन मला मिळालं. या प्रबंधाच्या अंतिम टप्प्यात मला मा. अशोकराव आणि गायत्रीताई यांचं खूप सहकार्य मिळालं.

माझ्या शोधप्रबंधामध्ये सर्वेक्षण हाही एक भाग होता. मी या सर्वेक्षणांतर्गत त्यावेळी चालू असलेल्या पंचकोशाधारित बारा गुरुकुलांना भेट दिली. त्याबरोबरच गुजरातमध्ये विद्याभारती या संस्थेतर्फे चालविला जाणारा समग्र विकास प्रकल्प चालू असलेल्या शाळा पाहिल्या. या अभ्यासासाठी काही मुलाखतीही घेतल्या. त्यातल्या दोन मुलाखती अतिशय संस्मरणीय आहेत. दिल्ली येथे निवास असलेले आणि विद्याभारतीच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रातला जवळपास ५० वर्षांचा सर्व स्तरांवरचा अनुभव असलेले मा. दीनानाथ बत्रा यांची मुलाखत मी घेतली होती. मा. गिरीशरावांनी यांचे नाव सुचविले होते. दुसरी मुलाखत गुजरात मध्ये शिक्षण क्षेत्रात भारतीयता आणण्याच्या उद्देशाने पुनरुत्थान ट्रस्टची स्थापना करणाऱ्या मा. इंदुमती काटदरे यांची घेतली. त्यांच्याशी झालेल्या परिचयातून नंतर त्या रत्नागिरीत व्याख्यानासाठी आल्या होत्या. या सर्वेक्षणांतर्गत दिल्ली येथील अरविंदाश्रमाची 'मीरांबिका' शाळा पाहण्याचीही संधी मिळाली. तिथल्या मा. सुलोचनादीदी यांची घेतलेली मुलाखत हा एक छान अनुभव होता. हे सारेच अनुभव अविस्मरणीय आहेत.

**प्रबोधिनीत जो शिक्षणाचा विचार केला जातो, तो करणारे आपण एकटेच नाही याची जाणीव करून देणारे बरेच अनुभव मला या निमित्ताने आले. समविचारी पण अभिव्यक्ती वेगळी असलेल्या या संस्था आहेत असं मला वाटतं.**

**डॉक्टर अशी पदवी मिळाल्यावर छान वाटतच आहे. याचं श्रेय मी आदरणीय आण्णांना देते. कारण मी Ph.D. केलं पाहिजे हे बीज त्यांनी माझ्या मनात रुजवलं होतं.**

आमच्या कामाचा भाग म्हणून शोधनिबंध लिहावे लागतात, सादर करावे लागतात. Ph.D. नंतर हे मी अधिक

आत्मविश्वासाने करू शकते आहे. याचं एक उदाहरण म्हणजे २०१५ मध्ये मला बँकॉक इथे एका आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंध वाचण्याची संधी मिळाली होती. प्रबोधिनीतील विद्याव्रत संस्कार हा विषय त्यासाठी मी घेतला होता. तसेच Ph.D. केल्यानंतर माझ्या दृष्टिकोनात निश्चितच बदल झाला. यामुळे संशोधनाची शिस्त काय असते किंवा त्यासाठी काय विचार करावा लागतो हे शिकले. संशोधनाच्या दृष्टीने अनेक विषयांचा विचार करायला लागले. आता नुकतीच २०१९ साली मला Ph.D. साठी मार्गदर्शक म्हणून पण मान्यता मिळाली आहे.




**विद्यार्थी आणि शिक्षण पद्धतीतरश्ररिपररींहरश्रूशऽूरकजज.उजचील बदल**

महाविद्यालयामधे शिकवताना काही मर्यादा आहेत असं मला नक्की वाटतं. अनेकदा व्याख्यान पद्धतीचाच अवलंब केला जातो. शिक्षक शिकवतात आणि विद्यार्थी ऐकतात हेच चित्र अनेकदा दिसतं. परंतु त्यातूनही काही मूल्य रुजविण्याचा प्रयत्न करते. आपल्याला केवळ मार्कांसाठी अभ्यास करायचा नाही आणि मार्कांसाठी अभ्यास न करताही मार्क मिळू शकतात हे मी विद्यार्थ्यांना कायम पटवून देण्याचा प्रयत्न करते. प्रबोधिनीशी तुलना करता इथे वर्गात विद्यार्थ्यांच्या क्षमतांमध्ये प्रचंड फरक जाणवतो. **एक नापास होणारा आणि एक विद्यापीठात क्रमांक मिळवणारा असे दोन टोके असलेल्या वर्गात या दोन्ही पातळ्यांना विचारात घेऊन शिकवणं हे थोडं आव्हानात्मक असतं. या क्षमता वेगळ्या असतानाही सगळ्यांकडे सारखंच लक्ष देणं जमलं पाहिजे असं वाटतं. तसा प्रयत्न मी नेहमी करते.**

गेल्या २३ वर्षांमध्ये महविद्यालयात अनेक बदल झाले आहेत. शिकवण्याच्या पद्धतींमध्ये खूप नवीन-नवीन भर पडत आहे, तंत्रज्ञानाचा वापर वाढलेला आहे. खडू आणि फळा याच्या पुढे जाऊन OHP, PPT ते आता करोनासंकटामुळे online शिकवणे इथपर्यंतचा बदल झालेला आहे हे नक्की जाणवतं. हा बदल आकर्षक आहे आणि मुलांना तो हवाहवासा वाटणारा आहे. दुसरीकडे असंही वाटतं की १९९७ साली मी जेव्हा इथे पहिल्यांदा आले तेव्हा नात्यात जो एक गोडवा होता, शिक्षकांचे एकमेकांशी खूप चांगले संबंध होते ते आता थोडे कमी आणि professional व्हायला लागले आहेत. या कृत्रिम वातावरणात व्यक्तिगत नाती मागे पडली.



**विद्यार्थ्यांमधला एक नकारात्मक बदल म्हणजे विद्यार्थ्यांची जिज्ञासा कमी झालेली आहे असं वाटतं. आता जिज्ञासा निर्माण करण्यापासून शिकवण्याची तयारी करावी लागते.** एकेकाळी मी असेही विद्यार्थी पाहिले आहेत की मला संस्कृत घ्यायचं होतं पण दुसराही विषय घ्यायचा होता म्हणून संस्कृत विषय घेता आला नाही, पण आम्हाला विषय शिकायचा आहे मग आम्ही तुमच्या तासाला येऊन बसू का, असे विचारणारे विद्यार्थी होते. पण आता मात्र संस्कृत घेतलेल्या विद्यार्थ्यांनाही तासाला बसायचं नसतं असा अनुभव यायला लागला आहे. हा अनुभव थोडासा माझ्याही उत्साहावर परिणाम करणारा आहे पण आपण आपल्या कर्तव्यापासून ढळायचं नसतं या संस्कारानुसार माझं काम प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न करते आहे.

संस्कृतकडे बघण्याचा लोकांचा दृष्टिकोन हा काहीसा मर्यादित आहे. संस्कृत म्हणजे एक धार्मिक भाषा आहे किंवा ही फक्त विशिष्ट वर्गाची भाषा आहे असं लोकांच्या मनात असतं. मी जेव्हा इथल्या विद्यार्थ्यांच्या घरी जायचे तेव्हा मला हा अनुभव आलेला आहे.

संस्कृत घेतल्यावर हा प्रश्न हमखास विद्यार्थ्यांना विचारला जातो की काय करणार तू संस्कृत घेऊन, तुला कुठे नोकरी मिळणार आहे, काय उपयोग आहे, असे संस्कृत शिकण्यापासून परावृत्त करणारे पण लोक समाजात आहेत. ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करायला हवा असं मला नक्की वाटतं. **मला नेहमी वाटतं की वर्तमानाशी सांगड घालणारा संस्कृतचा अभ्यासक्रम हवा.** विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातून अजून खूप देता येऊ शकेल असं वाटतं. मध्यंतरी मी अभ्यास करून एक

कल्पना मांडली होती, की आपले जे सोळा संस्कार आहेत, त्यातल्या मंत्राचा अभ्यास करावा. या संस्कारांचा आपल्या दैनंदिन आयुष्याशी जवळचा संबंध आहे. यांचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून अभ्यास केला जावा. प्रबोधिनीत केलेली संस्कारांची मांडणी याच दिशेनं जाणारी आहे. हे झालं धार्मिक बाबतीत. पण सध्या Sciences in Sanskrit हे सूत्र घेऊन अनेक ठिकाणी काम चालू आहे. शास्त्र या आधुनिक संकल्पनेनुसार संस्कृतमध्ये जे ग्रंथ आहेत त्यांचा परिचय विद्यार्थ्यांना व्हायला हवा असं वाटतं. उदाहरणार्थ, गणिताचा सिद्धांत शिरोमणी हा ग्रंथ. त्यातले काही निवडक श्लोक घेऊन गणित संस्कृत मधून लिहिलं आहे म्हणजे नक्की काय हे समजू शकेल. यावर काम करणारे विद्यार्थी इथेही आहेत. अप्रकाशित पण चांगलं साहित्य या भाषेत आहे, किंबहुना संस्कृतमध्ये आधुनिक साहित्यसुद्धा बरंच आहे. आज उत्तर भारतात काही ठिकाणी संस्कृतमध्ये गझल लिहिली जाते. नवीन प्रकारचं कितीतरी साहित्य निर्माण होत आहे. या सगळ्याचा विचार अभ्यासक्रम तयार करताना करावा असं वाटतं.

**संस्कृत भाषेच्या माध्यमातून अर्थार्जनाच्या विविध संधी उपलब्ध होतील असे उपक्रम राबवायला हवेत. असे प्रयत्न संस्कृतच्या क्षेत्रात सुरू होत आहेत. आम्ही एक विक्री उपक्रम इथे मागच्या वर्षी चालू केला होता. संस्कृत वचनं लिहिलेले कप, Tshirts हे मागवून ते विकण्याचा प्रयत्न केला होता. पण काही कारणांमुळे सातत्य राहिलेले नाही. खरं तर शिक्षणाच्या या क्षेत्रात इतकं काही करण्यासारखं आहे की आपलीच शक्ती कमी पडते. आप्पा कायम म्हणायचे की रोज काहीतरी नवीन सुचलं पाहिजे, ही सवय इतकी अंगवळणी पडलेली आहे की नवीन करण्यासाठी रोज नव्या दिशा मिळत असतात.**

परिपूर्ण विद्यार्थी कसा असावा याबाबत मला गीतेची परिभाषा वापरावीशी वाटते. गीतेला अपेक्षित असलेले स्वधर्माचरण करणारा आणि पुढे जाऊन कर्मयोगाचं आचरण करणारा असावा असं वाटतं. **विद्यार्थ्यांनी कायम स्वार्थ आणि परमार्थ असा दोन्हीचा मेळ घातला पाहिजे. माझा अभ्यास, माझी कृती ही उत्तम असली पाहिजे हा झाला स्वार्थ, आणि माझ्या शिक्षणाचा, कार्याचा समाजाला काहीतरी उपयोग झाला पाहिजे हा झाला परमार्थ. अभ्यासक्रमात गीतेचा काही भाग असल्यामुळे हे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्याची संधी मला मिळते.**

पाश्चिमात्य संस्कृतीचा मोठा पगडा जनमानसावर असताना आपली संस्कृती समाजापर्यंत पोचवण्यासाठी सर्वच स्तरांवर प्रयत्न व्हायला हवेत असं वाटतं. **पाश्चिमात्य म्हणजे वाईट आणि आपलं म्हणजे चांगलं अशा प्रकारे कधीच मत मांडू नये. कारण या सगळ्या संकल्पना सापेक्ष आहेत. प्रत्येकच संस्कृतीमध्ये काही अनुकूल आणि काही प्रतिकूल गोष्टी असतात,** त्यामुळे भारतीय संस्कृतीतही सगळं चांगलंच आहे असं म्हणणं अवघड आहे. पाश्चिमात्य संस्कृतीमधल्याही ज्या गोष्टी चांगल्या आहेत त्या घ्याव्यात. उदाहरणार्थ स्वच्छता, शिस्त किंवा अभ्यास आणि कामाची शिस्त हे आपण शिकण्यासारखं आहे आणि आपल्या संस्कृतीमधल्या ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या आपण जपूया असं मला वाटतं. याचा संबंध नक्कीच संस्कृतशी आहे. आज संस्कृतशी संबंधित अनेक गोष्टी शिकण्यासाठी खूप लोक बाहेरून येत असतात. मी माझ्या विद्यार्थ्यांना कायम सांगते की संस्कृत भाषेतला हा सगळा मूळ असा खजिना आहे, तो इतर कुणाकडे नाही हे आपलं बलस्थान आहे. या सगळ्याची सांगड घालता यायला हवी. त्यापुढे जाऊन मला असं वाटतं की आता आपण विश्वसंस्कृती या शब्दाचा प्रयोग करावा. मानवतेकडे वाटचाल करणारी संस्कृती हीच विश्वसंस्कृती असावी. कुठल्याही संस्कृतीमध्ये जर माणुसकीला काळीमा फासणाऱ्या गोष्टी असतील तर त्या नक्कीच वाईट आहेत. पण मुख्य विचार हा मानवधर्माचाच करायला हवा असं वाटतं! **त्यामुळे पाश्चिमात्य आणि भारतीय असा जो भेद आहे तो ओलांडून एका वैश्विक संस्कृतीकडे वाटचाल करायला हवी असं मला वाटतं. आज कितीतरी गोष्टी एकमेकांमध्ये मिसळलेल्या आहेत, अशा युगात आपण भिंती बांधून थांबून राहता कामा नये.** खरंतर या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे आणि या विषयाला अनेक बाजू आहेत. तो सगळा विचार इथे मांडणं शक्य नाही.

संस्कृत हे एक स्वाभिमान आणि अस्मिता जागरणाचं माध्यम आहे असं मला वाटतं. भारतीय संस्कृतीचा परिचय त्यातून होतो. भारतीय संस्कृती समजून घेण्यासाठी संस्कृतचे माध्यम कसे वापरता येईल यासाठी काही करण्याची इच्छा आहे. संस्कृतच्या विद्यार्थ्यांना अध्यापन आणि संशोधन हे दोन पर्याय सोडता आणखी काय उपलब्ध करून देता येईल यावरही मला काहीतरी प्रयत्न करायचा आहे. रत्नागिरीत प्रबोधिनीचं प्रासंगिक काम अनेक वर्षे चालू आहे. पण सातत्याने काही काम करणे शक्य आहे का यासाठी विचार चालू आहे. त्या दृष्टीने काही करण्याची इच्छा आहे.

**या जगामध्ये आपल्याला जर सतत शिकायचं असेल, परिपूर्ण व्हायचं असेल तर आपल्या मनाची दारं आपण कायम उघडी ठेवायला हवीत. गंगा वाहतेच आहे आपण त्याचा लाभ कसा आणि किती करून घेणार हे आपल्यावर अवलंबून असतं.** प्रबोधिनीत आपण माणसं जोडायला शिकतो, multi tasking शिकतो. प्रबोधिनीतल्या वातावरणात असंख्य

गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. आपल्याला प्रबोधिनीत आपल्या जीवनाचं प्रयोजन सापडू शकतं. **मला हे प्रयोजन अर्थात स्वधर्म प्रबोधिनीत गवसला तसा तो तुम्हालाही सापडू शकतो.** आपल्या स्वभावाला पैलू प्रबोधिनीत पडतात, आपण प्रबोधिनीत विचार करायला शिकतो, याने आपल्या जीवनाला अर्थ प्राप्त होतो. तिथे मिळणारी शिदोरी ही आयुष्यभर पुरणारी आहे, ती शिदोरी आपल्या जीवनाला वळण देणारी आहे यावर आपण सगळ्यांनी विश्वास ठेवूयात. रस्ता बदलला तरी आपल्यातलं प्रबोधिनीपण सुटता कामा नये असं मला वाटतं. अनेक समस्यांचं मूळ हे आपण आपलं राष्ट्रीयत्व समजून न घेणं हे असतं. हे समतोल साधणारे राष्ट्रीयत्वाचे संस्कार आपल्यावर प्रबोधिनी करते. या सगळ्या संस्कारांमुळे आपली अस्मिता आणि अहंकार यातली सीमारेषा ओळखण्याची क्षमता आपल्यात निर्माण होते असं आज पन्नाशीला आल्यावर मला वाटतं. मी प्रबोधिनीशी जोडले गेले हे माझं परमभाग्य आहे आणि यासाठी त्या परमेश्वराच्या चरणांशी मी कृतज्ञ आहे.



**आकाशवाणीवर संस्कृतमधून बातम्या देणारे पहिले प्रवाचक डॉ. बलदेवानंद सागर आणि त्यांच्या पत्नी सौ. शालिनी सागर कालिदास स्मृति समारोह व्याख्यानमालेत**



**संपूर्णानन्द, संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु आणि आधुनिक संस्कृत साहित्यकार डॉ. अभिराज राजेन्द्र मिश्र कालिदास स्मृति समारोह व्याख्यानमालेत**




**संस्कृतमधील संशोधनासाठी डॉ. प. वि. वर्तक यांच्या हस्ते पुरस्कार व सन्मान**

## Rapid Fire

१. आवडता चित्रपट - Sound of Music (मी फारसे पाहत नाही)

२. आवडते पुस्तक - खूप आहेत त्यातलं एक 'ऐसपैस गप्पा दुर्गाबाईंशी'

३. आवडता संस्कृत रचनाकार/ साहित्य- भास

४. तुमचा छंद/ आवड - वाचन, गायन

५. आवडते प्रबोधिनीतील शिक्षक - सर्व!! एक नाव सांगणं कठीण आहे

**पहिली प्रतिक्रिया**

- शिक्षण - मनुष्यघडण
- संस्कृत भाषा - प्रत्येक भारतीयाला किमान ओळख माहिती हवी
- भारतीय तत्त्वज्ञान- आदर्श पण व्यवहाराशी सांगड कठीण
- ज्ञान प्रबोधिनी - माझी शाळा

६. आत्ताचे क्षेत्र सोडता अजून कुठल्या क्षेत्रात काम करायला आवडले असते?/ संस्कृत नसेल तर काय असेल?
- शेतीसंबंधी / गायन

**कल्पना भालेकर - आठल्ये**
**7720032302**
**kalpanaathalye@yahoo.com**

**मुलाखत - ईशा कान्हेरे, चिन्मयी खरे** **शब्दांकन - चिन्मयी खरे**

**संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**

**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org